# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१

E-mail :- desk5@dte.org.in Web :- http://www.dte.org.in

क्रमांक : ५(३)/पदांचा आढावा/२०११/२३५८७

दिनांक : २३ नोव्हेंबर, २०११

प्रति,

सहसंचालक,

तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर

**विषय : तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील कार्यालये/ संस्थांमध्ये कार्यरत पदांचा फेर आढावा घेण्याबाबत....**

शासनाच्या वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक असंक-१००१/प्रक्र२९/२००१/वित्तीय सुधारण दिनांक १० सप्टेंबर, २००१ मधील तरतुदींनुसार तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील प्रशासकीय कार्यालये तथा सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित शैक्षणिक संस्थांतील सन २०००-२००१ पर्यंतच्या चालविण्यांत येणा-या अभ्यासक्रमानुसार मंजूर पदांचा आढावा घेण्यांत आलेला असून आढाव्यानंतर संस्था/कार्यालयात कार्यरत पदांचा एकत्रित गोषवारा शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक टिईडी-८००१/(३२१/०१-भाग-३)/तांशि-५, दिनांक १-४-२००४ मध्ये नमूद करण्यांत आलेला आहे.

सदरच्या दिनांक १० सप्टेंबर २००१ च्या शासन निर्णयान्वये दरवर्षी ३१ ऑक्टोबरपूर्वी आढावा घेण्याबाबतचेही आदेश देण्यांत आलेले आहेत. त्या अनुषंगाने सन २००१-२००२ पासून शासकीय तथा अशासकीय अनुदानित संस्थांमध्ये कांही अभ्यासक्रम नवीन सुरु करण्यांत आलेले आहेत तसेच काही अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करण्यांत आलेली आहेत. त्याचप्रमाणे पूर्वीच्या आढाव्यात काही त्रुटी राहिल्या आहेत. त्यानुसार संबंधित नवीन अभ्यासक्रमानुसार नवीन पदे निर्माण करणे किंवा प्रवेशक्षमतेत वाढ झाल्यामुळे अतिरिक्त नवीन पदे निर्माण करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे जे अभ्यासक्रम बंद झालेले आहेत किंवा ज्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत घट झालेली आहे. अशा अभ्यासक्रमासाठी मंजूर असलेल्या पदांना अतिरिक्त ठरविणे आवश्यक आहे. त्याकरिता पदांचा आढावा पुन्हा नव्याने घेणे आवश्यक आहे. त्यासाठी सहसंचालक स्तरावर त्यांच्या अध्यक्षतेखाली शासकीय व अनुदानित संस्थांच्या प्राचार्यांकडून प्राप्त प्रस्तावांची छाननी करण्यासाठी विभागीय स्तरावर खालीलप्रमाणे समिती गठित करण्यांत येत आहे. सदर समितीने बैठक आयोजित करुन त्यांच्या शिफारशींसह संस्थानिहाय अहवाल **दिनांक ५ जानेवारी, २०१२ पर्यंत** या कार्यालयास सादर करण्यांत यावा.

आस्था-१ सर्व संस्थाकडून माहिती मागवावी व बैठक बोलवावी

| | | | |
|---|---|---|---|
| १) | सबंधित विभागाचे सहसंचालक | -- | अध्यक्ष |
| २) | अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाचे प्राचार्य (शासकीय वा अनुदानित संस्थांमधील एक प्राचार्य) | -- | सदस्य |
| ३) | औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाचे प्राचार्य (शासकीय वा अनुदानित संस्थांमधील एक प्राचार्य) | -- | सदस्य |
| ४) | अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाचे प्राचार्य (शासकीय वा अनुदानित संस्थांमधील एक प्राचार्य) | -- | सदस्य |
| ५) | औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाचे प्राचार्य (शासकीय वा अनुदानित संस्थांमधील एक प्राचार्य) | -- | सदस्य |
| ६) | हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉ. पदविका अभ्यासक्रमाचे प्राचार्य | -- | सदस्य |
| ७) | संबंधित विभागातील प्रशासकीय अधिकारी | -- | सदस्य सचिव |

सर्व सहसंचालकांनी त्यांच्या अधिपत्याखालील शासकीय तसेच अशासकीय अनुदानित संस्थांतील पदांचा आढावा नव्याने घेण्यासाठी उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे समिती गठित करुन अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, फार्मसी काऊन्सिल ऑफ इंडिया, कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर तसेच पदवी अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ निहाय अभ्यासक्रमाचा प्रत्यक्ष कार्यभार आणि पदविका अभ्यासक्रमासाठी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचा प्रत्यक्ष कार्यभार इत्यादींची अद्ययावत मानके व शिफारशी विचारात घेऊन अभ्यासक्रम निहाय प्रत्यक्ष कार्यभारानुसार व अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकांनुसार त्यांच्या संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम किंवा प्रवेशक्षमतेत वाढ झाल्यामुळे अथवा प्रत्यक्षात मानकांनुसार पदांची निर्मिती न झाल्यामुळे आवश्यक असलेली शिक्षकीय व शिक्षकेतर पदे नव्याने निर्माण करण्यासाठी अथवा पदे अतिरिक्त ठरविण्यासाठीची माहिती सोबत जोडलेल्या विवरणपत्रात भरुन संस्थानिहाय या कार्यालयास **दिनांक ५ जानेवारी, २०१२ पर्यंत** सादर करावी. (पदांची संख्या दर्शविताना कार्यभारानुसार तसेच प्रत्यक्ष मानकांनुसार विद्यार्थी : शिक्षक यांचे गुणोत्तर विचारात घेऊन किती पदे येतात ते दर्शवून त्यापैकी कमी असलेली पदे ग्राह्य धरण्यांत यावीत)

तसेच शिक्षकेतर पदांसाठी संचालनालयात दिनांक ८, ९ व १० ऑक्टोबर, २००७ रोजी आयोजित केलेल्या बैठकीत ठरलेले धोरण आधारभूत मानून त्याप्रमाणे पदसंख्या निश्चित करावी. (सुलभ संदर्भासाठी सदरच्या बैठकीचे इतिवृत्त सोबत जोडले आहे)

त्याचप्रमाणे मागील आढाव्याच्या वेळी ब-याचश्या संस्थांनी पाठविलेल्या माहितीमध्ये अनेक त्रुटी असल्यामुळे आढाव्याअंती निर्गमित करण्यांत आलेल्या पदांमध्ये त्रुटी राहिलेल्या आहेत. तरी ही बाब लक्षात घेता सर्व सहसंचालकांना कळविण्यांत येते की, आपल्या अधिपत्याखालील संस्थांची माहिती अचूक पाठविण्याची दक्षता घेण्यांत यावी. त्याचप्रमाणे पदे नव्याने निर्माण करण्यासाठी पदांच्या आवश्यकतेबाबतचे प्रतिपादनही सोबत जोडण्यांत यावे.

तसेच सर्व संस्थेत तसेच विभागीय कार्यालयांत आढाव्यानंतर अस्तित्वात असलेल्या मंजूर, भरलेल्या व रिक्त पदांचा तपशील सोबतच्या विवरणपत्र क मध्ये देण्यांत यावा. त्याचप्रमाणे पूर्वीच्या आढाव्यात अतिरिक्त ठरविण्यांत आलेल्या परंतु अद्यापही समावेशन न झालेल्या संस्थेत कार्यरत असलेल्या पदांचा तपशील विवरणपत्र ड मध्ये देण्यांत यावा. व सदरची पदे मंजूर असल्याबाबतच्या शासन निर्णयाची प्रत त्यासोबत जोडण्यांत यावी. तसेच विभागीय कार्यालयातील पदांची माहिती विवरणपत्र इ मध्ये देण्यांत यावी.

**(दयानंद मेश्राम)**
सहसंचालक, तंत्रशिक्षण,
म. रा., मुंबई

---

*जा.क्रं.विकापु/आस्था-१/२ /पदांचा आढावा/२०११/ ८८५८* *तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे*
*दिनांक :* 5 DEC 2011

*प्रति,*
*सर्व प्राचार्य /संस्थाप्रमुख,*
*पुणे तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील शासकीय / अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माण व तत्सम पदवी / पदविका संस्था*

*वरील पत्र सहपत्रासह माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या संस्थेची माहिती पत्रासोबत असलेल्या विवरणपत्राप्रमाणे पत्रामध्ये नमूद केलेल्या सूचनांचे पालन करुन ती* **ISM word** *मध्ये* **DVB TT Natraj** *या फॅान्टमध्ये तयार करुन दिनांक १७.१२.२०११ पर्यंत या कार्यालयास सदर करण्यात यावी. तसेच सदर माहिती पेन ड्राईव्ह / सीडीमध्ये या कार्यालयास सादर करण्यात यावी.*

*प्र.सहसंचालक,*
*तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे*

*प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी*
प्रत- आस्था-२

## विवरणपत्र - अ

### नव्याने सुरु करण्यांत आलेल्या अभ्यासक्रमासाठी अथवा प्रवेशक्षमतेत वाढ झाल्यामुळे आवश्यक असलेली नवीन पद निर्मिती करण्याबाबतचे विवरणपत्र

संस्थेचे नांव : ------------------------------------

| अभ्यासक्रम | अभ्यासक्रम सुरु झाल्याचे वर्ष | प्रत्यक्ष कार्यभार | आवश्यक असलेली पदे | | विद्यार्थी : शिक्षक गुणोत्तरानुसार आवश्यक पदे | शासन निर्णय दिनांक १-४-२००४ प्रमाणे पदे मंजूर असल्यास मंजूर पदांची संख्या | कमतरता असलेली व नवीन निर्माण करावयाच्या पदांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पदनाम व वेतनश्रेणी | संख्या | | | |
| | | | | | | | |

## विवरणपत्र - ब

### अभ्यासक्रम बंद करण्यांत आल्यामुळे अथवा अभ्यासक्रमातील प्रवेशक्षमतेत घट झाल्यामुळे अनावश्यक असलेली पदे अतिरिक्त ठरविण्यासाठीचे विवरणपत्र

संस्थेचे नांव : --------------------------

| अभ्यासक्रम | अभ्यासक्रम बंद झाल्याचे वर्ष | प्रत्यक्ष कार्यभार | आवश्यक असलेली पदे | | विद्यार्थी : शिक्षक गुणोत्तरानुसार आवश्यक पदे | शासन निर्णय दिनांक १-४-२००४ प्रमाणे पदे मंजूर असल्यास मंजूर पदांची संख्या | अनावश्यक असलेली अतिरिक्त करावयाची पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पदनाम व वेतनश्रेणी | संख्या | | | |
| | | | | | | | |

## विवरणपत्र - क

### संस्थेतील मंजूर, भरलेल्या व रिक्त पदांचा तपशील

संस्थेचे नांव : --------------------------

| पदनाम व वेतनश्रेणी | मंजूर पदे | | | भरलेली पदे | रिक्त पदे | पद मंजूरीचा शासन निर्णय क्रमांक व दिनांक | पदे शासन निर्णय दिनांक १-४-२००४ मध्ये समाविष्ट आहेत किंवा नाहीत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | स्थायी | अस्थायी | एकूण | | | | |
| | | | | | | | |

## विवरणपत्र - ड

### पूर्वीच्या आढाव्यात अतिरिक्त ठरविण्यांत आलेल्या तथापि अद्यापही समावेशन न झालेल्या संस्थेत कार्यरत असलेल्या पदांचा तपशील

संस्थेचे नांव : --------------------------

| अतिरिक्त पदाचे पदनाम व वेतनश्रेणी | पदसंख्या | समावेशन न होण्याची कारणे | सदरच्या पदाची संस्थेस आवश्यकता आहे किंवा कसे? | आवश्यकता असल्यास सदर पदाचा कार्यभार | शिक्षकेतर पदासंदर्भात समर्थन |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

## विवरणपत्र - इ

### विभागीय कार्यालयातील पदांचा तपशील

विभागीय कार्यालयाचे नांव : --------------------------

| अभ्यासक्रम | संस्थांची संख्या | प्रवेश क्षमता | मंजूर पदे | | आवश्यक पदे |
|---|---|---|---|---|---|
| | | | पदनाम | पदसंख्या | पदसंख्या |
| पदवी | | | | | |
| पदविका | | | | | |

| | | |
|---|---|---|
| २०. | श्री. जी.बी. निकम, प्रशासकीय अधिकारी, मु.का., मुंबई | --- |
| २१. | श्री. मिसाळ, प्रशासकीय अधिकारी, तंत्र शिक्षण वि.का., पुणे | --- |
| २२. | श्रीमती दि.दि. जाधव, रचना व कार्यपध्दती अधिकारी, | --- |
| २३. | श्रीमती मा.सु. दांडकर, नियोजन अधिकारी, तंत्र शिक्षण, मु.का., मुंबई | --- |

सदरील बैठकीमध्ये खालील विषयांवर सविस्तर चर्चा करण्यांत आली.

**१) अभ्यासक्रम निहाय शिक्षकीय पदे अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद/फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया तसेच आर्किटेक्चर कॉन्सिल च्या मानकांप्रमाणे आहेत किंवा नाहीत याबाबतचा आढावा घेणे.**

तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील संबंधित संस्थामध्ये असलेल्या पदांच्या स्वरुपामध्ये सुसूत्रता असणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन अध्यक्षांनी केले. त्यासाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद / फार्मसी काऊन्सिल ऑफ इंडिया / आर्किटेक्चर काऊन्सिलच्या मानकांप्रमाणे पदांचा आढावा घेण्यासाठी सर्व सहसंचालक तंत्र शिक्षण विभागीय कार्यालयांकडून त्यांच्या अधिपत्याखालील संस्थांचे प्रस्ताव मागविण्यात आले होते. तथापि, सदरील प्रस्तावांची छानणी केली असता संस्थांनी केलेली मागणी ही मानकांप्रमाणे आढळली नाही. काही संस्थांनी जास्त पदांची मागणी केली तर काही संस्थांनी कमी पदांची मागणी केली होती. सर्व संस्थांमध्ये पदांची सुसूत्रता रहाण्यासाठी संबंधित संस्थेत सुरु असलेल्या अभ्यासक्रमातील कार्यभाराचा विचार करुन व संबंधित संस्थेत वाढलेल्या प्रवेशक्षमतेचा विचार करुन अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद यांनी ठरवून दिलेल्या मानकाचा विचार करुन अभ्यासक्रम निहाय पदे कशी मंजूर असतील याबाबत पुढीलप्रमाणे चर्चा होऊन पदवी व पदविका अभ्यासक्रमनिहाय पदांची खालीलप्रमाणे मानके दर्शविण्यात आलेली आहेत. त्याप्रमाणे ठरविण्यात आलेल्या मानकानुसार संस्थानी प्रस्ताव तयार केल्यानंतर सदर प्रस्तावांची छाननी करण्यासाठी या संचालनालयात बैठक आयोजित करण्यात येऊन तदनंतर सदर पदांसाठी येणा-या खर्चाची तरतूद करण्यासाठी या कार्यालयातील नियोजन विभागाने याबाबतचा प्रस्ताव तयार करुन तो शासनास सादर करण्याचे ठरले.

## अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रम

संबंधित अभ्यासक्रमाच्या अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकांनुसार दर्जेदार शिक्षण देण्यासाठी शिक्षक व विद्यार्थी यांचे गुणोत्तर १ : १० असे प्रमाण आहे. शिक्षकांची कमीत कमी एवढी संख्या असलीच पाहिजे, तथापि, शिक्षक व विद्यार्थी यांचे जास्तीत जास्त गुणोत्तर १ : १५ असे असून, सदरच्या बैठकीत शिक्षक व शिक्षकेतर पदांचा आढावा घेत असताना खालील मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करण्यास सहमती दर्शविण्यात आली.

शिक्षकीय पदे गुणोत्तर — १ : १२.५ (विना स्वायत्त संस्थासाठी)
शिक्षकीय पदे गुणोत्तर — १ : ११ (स्वायत्त संस्थासाठी)
शिक्षक शिक्षकेतर पदे गुणोत्तर — १ : १.५ याप्रमाणे ठरविण्यात आलेले असून सहाय्यकारी व कार्यालयीन कर्मचारी पदांचे गुणोत्तर खालीलप्रमाणे निश्चित केलेले आहे.
सहाय्यकारी पदे (तांत्रिक व अतांत्रिक) १ : ०.९
कार्यालयीन कर्मचारी (सफाईगार, माळी, सुरक्षा रक्षक वगळून) — १ : ०.६

स्वायत्त संस्थांना विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेणे तसेच परीक्षांचे निकाल लावणे ही कामे [illegible] पार पाडावी लागत असल्यामुळे सदरच्या संस्थेत स्थापन केलेल्या परीक्षा नियंत्रण विभागाकरिता खालील ९ पदे [illegible] दिलेल्या मानकाच्या प्रमाणाव्यतिरिक्त (additional) निर्माण [illegible] समिती सदस्यांनी सहमती दर्शविली. परीक्षा संस्थेच्या घेणार असल्यामुळे हे गरजेचे आहे.

१) परीक्षा नियंत्रक (सहाय्यक प्राध्यापक समकक्ष [illegible]) [illegible]
[illegible] अधिकारी — [illegible]

३) डाटा एंट्री ऑपरेटर -- २ पद
४) वरीष्ठ लिपीक -- १ पद
५) कनिष्ठ लिपीक -- १ पद
६) प्रोग्रॅमर -- १ पद
७) हमाल -- २ पदे

## पदविका अभ्यासक्रम

संबंधित अभ्यासक्रमाच्या अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकांनुसार शिक्षक व विद्यार्थी यांचे प्रमाणे १ : १६ पेक्षा अधिक असू नये व १ : ११ पेक्षा कमी असू नये असे असल्यामुळे पदविका संस्थातील पदांचा आढावा घेत असताना खालील मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करण्यास सहमती दर्शविण्यात आली.

शिक्षकीय पदे गुणोत्तर -- १ : १५ (विना स्वायत्त संस्थांसाठी)
शिक्षकीय पदे गुणोत्तर -- १ : १३ (स्वायत्त संस्थांसाठी)
शिक्षक शिक्षकेतर पदे गुणोत्तर -- १ : १.५ याप्रमाणे ठरविण्यात आलेले असून सहाय्यकारी व कार्यालयीन कर्मचारी पदांचे गुणोत्तर खालीलप्रमाणे निश्चित केलेले आहे.
सहाय्यकारी पदे (तांत्रिक व अतांत्रिक) १ : ०.९
कार्यालयीन कर्मचारी (सफाईगार, माळी, सुरक्षा रक्षक वगळून) -- १ : ०.६

स्वायत्त संस्थांना विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेणे तसेच परीक्षांचे निकाल लावणे ही कामे संस्थास्तरावर पार पाडावी लागत असल्यामुळे सदरच्या संस्थेत स्थापन केलेल्या परीक्षा नियंत्रक विभागाकरिता खालील ५ पदे ठरवून दिलेल्या मानकांच्या प्रमाणाव्यतिरिक्त (additional) निर्माण करण्यास सर्व समिती सदस्यांनी सहमती दर्शविली.

१) परीक्षा नियंत्रक (विभाग प्रमुख समकक्ष) -- १ पद (बदलीने भरण्यात येईल.)
२) डाटा एंट्री ऑपरेटर -- १ पद
३) कनिष्ठ लिपीक -- १ पद
४) प्रोग्रॅमर -- १ पद
५) हमाल -- १ पद

तंत्रनिकेतनाच्या पदविका संस्थेतील ५ अभ्यासक्रमाच्या ३०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचा विचार करुन शिक्षक व शिक्षकेतर पदे कशी राहतील याबाबतचे परिशिष्ट-१ यासोबत जोडण्यात येत आहे.

## औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रम

संबंधित अभ्यासक्रमाच्या अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकांनुसार शिक्षक व विद्यार्थी यांचे गुणोत्तर १ : १५ असे असून, सदरच्या बैठकीत शिक्षक व शिक्षकेतर पदांचा आढावा घेत असताना खालील मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करण्यास सहमती दर्शविण्यात आली.

शिक्षकीय पदे गुणोत्तर -- १ : १३
शिक्षकेतर पदे गुणोत्तर -- १ : १.८
शिक्षक शिक्षकेतर पदे गुणोत्तर -- १ : १.८ याप्रमाणे ठरविण्यात आलेले असून सहाय्यकारी व कार्यालयीन कर्मचारी पदांचे गुणोत्तर खालीलप्रमाणे निश्चित केलेले आहे.
सहाय्यकारी पदे (तांत्रिक व अतांत्रिक) १ : १.२
कार्यालयीन कर्मचारी (सफाईगार, माळी, सुरक्षा रक्षक वगळून) -- १ : ०.३

उपरोक्त गुणोत्तराप्रमाणे फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडियाच्या स्टँडर्ड फॉर्म [illegible] सहाय्यकारी व कार्यालयीन कर्मचाऱ्यांची दर्शविण्यात आलेली पदे विचारात घेऊन खालील पद [illegible] सहमती दर्शविण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| प्रबंधक | -- | १ |
| अधिक्षक | -- | १ |
| वरीष्ठ लिपीक | -- | २ (यापैकी १ पद लेखापाल) |
| कनिष्ठ लिपीक | -- | ३ |
| भांडारपाल | -- | १ |
| शिपाई | -- | २ |
| ग्रंथपाल | -- | १ (८०००-१३५००) |
| डाटाएंट्री ऑपरेटर | -- | १ |
| तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक | | ६ |
| हमाल | -- | ८ |
| ॲनिमल हाऊसकीपर | | १ |
| माळी | -- | २ |
| पहारेकरी | -- | ३ |
| सफाईगार | -- | २ |

## औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम

संबंधित अभ्यासक्रमाचा अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या/फार्मसी काऊन्सिल ऑफ इंडिया यांच्या मानकांनुसार शिक्षक व शिक्षकेतर पदांचा आढावा घेत असतांना खालील मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करण्यास सहमती दर्शविण्यांत आली.

शिक्षकीय पदे.— प्राचार्य — १ अधिव्याख्याता ६ एकूण ७ पदे

शिक्षकेतर पदे गुणोत्तर — शिक्षकीय पदे : शिक्षकेतर पदे १ : २

| | | पदे |
|---|---|---|
| १) अधिक्षक | -- | १ |
| २) कनिष्ठ लिपीक | -- | २ |
| ३) भांडारपाल | -- | १ |
| ४) शिपाई | -- | २ |
| ५) सफाईगार | -- | १ |
| ६) माळी | -- | १ |
| ७) प्रयोगशाळा तंत्रज्ञ | -- | २ |
| ८) हमाल | -- | ३ |

## औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदविका अभ्यासक्रम एकत्र

काही संस्थांमध्ये औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदविका अभ्यासक्रम एकत्रितपणे चालविण्यांत येत असल्यामुळे संबंधित संस्थेत पदवी अभ्यासक्रमासाठी मंजूर असलेल्या पदांव्यतिरिक्त खालील अधिकची पदे मंजूर करण्यास सहमती दर्शविण्यांत आली.

| | | |
|---|---|---|
| कनिष्ठ लिपीक | -- | २ (भांडाराचे काम पहाण्यासाठी १ व ग्रंथालयाचे काम करण्यासाठी १) |
| सहाय्यक ग्रंथपाल | -- | १ |
| प्रोग्रामर | -- | १ |
| वरीष्ठ लिपीक | -- | १ |
| प्रयोगशाळा तंत्रज्ञ | -- | २ |
| हमाल | -- | २ |
| ग्रंथालय परिचर | -- | १ |

## वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रम

संबंधित अभ्यासक्रमाचा अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या/आर्किटेक्चर काऊन्सिल ऑफ इंडिया यांच्या मानंकांनुसार शिक्षक व विद्यार्थी यांचे ४० प्रवेशक्षमतेसाठी १ : १० असे गुणोत्तर ठरविण्यांत आलेले असून त्यापैकी २५ टक्के पदे अभ्यागत अधिव्याख्याता नेमून भरण्यांत यावीत असे निदेश आहेत. तरी, खालील पदे निर्माण करण्यास सहमती दर्शविण्यांत आली.

**अ) जे.जे. कॉलेज ऑफ आर्किटेक्चर (प्रवेशक्षमता ६७)**

शिक्षकीय पदे -- १ : १० (यापैकी २५ टक्के पदे अभ्यागत अधिव्याख्याते नेमावेत)

| | | |
|---|---|---|
| प्राचार्य | -- | ०१ |
| प्राध्यापक | -- | ०३ |
| सहाय्यक प्राध्यापक | -- | ०७ |
| अधिव्याख्याते | -- | १५ |
| **एकूण शिक्षकीय पदे** | -- | **२६ पदे** |

**शिक्षकेतर पदे ( १ : १.५)**

| | | |
|---|---|---|
| सिस्टीम ॲनलिस्ट | -- | १ |
| ग्रंथपाल | -- | १ |
| सहाय्यक ग्रंथपाल | -- | १ |
| ग्रंथालय परिचर | -- | १ |
| वरीष्ठ लिपीक | -- | ३ (त्यापैकी १ पद लेखापालाचे काम पाहील) |
| कनिष्ठ लिपीक | -- | ४ |
| भांडारपाल | -- | १ |
| अधिक्षक | -- | १ |
| मुख्य लिपीक | -- | १ |
| स्टेनो | -- | १ |
| शिपाई | -- | ४ |
| हमाल | -- | ५ |
| पहारेकरी | -- | ४ |
| सफाईगार | -- | ३ |
| तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक | -- | ३ |
| वीजतंत्री | -- | १ |
| वर्कशॉप निदेशक | -- | २ |
| प्रयोगशाळा सहाय्यक | -- | २ |
| **एकूण शिक्षकेतर पदे** | -- | **३९ पदे** |

**ब) बी.के.पी. एस. पुणे (प्रवेशक्षमता ४०).**

**शिक्षकीय पदे** -- १ : १० (यापैकी २५ टक्के पदे अभ्यागत अधिव्याख्याते नेमावेत)

| | | |
|---|---|---|
| प्राचार्य | -- | ०१ |
| प्राध्यापक | -- | ०२ |
| सहाय्यक प्राध्यापक | -- | ०६ |
| अधिव्याख्याते | -- | १२ |
| एकूण शिक्षकीय पदे | -- | २१ पदे |

शिक्षकेतर पदे (१ : १.५)

| | | |
|---|---|---|
| प्रबंधक | -- | १ |
| ग्रंथपाल | -- | १ |
| सहाय्यक ग्रंथपाल | -- | १ |
| ग्रंथालय परिचर | -- | १ |
| वरीष्ठ लिपीक | -- | २ (त्यापैकी १ पद लेखापालाचे काम पाहील) |
| कनिष्ठ लिपीक | -- | २ |
| भांडारपाल | -- | १ |
| अधिक्षक | -- | १ |
| शिपाई | -- | १ |
| हमाल | -- | ८ |
| तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक | -- | ३ |
| प्रोग्रॅमर | -- | १ |
| वर्कशॉप निदेशक | -- | २ |
| **एकूण शिक्षकेतर पदे** | -- | **२५ पदे** |

**अभियांत्रिकी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम**

प्राध्यापक १ सहाय्यक प्राध्यापक १ अधिव्याख्याता १ प्रयोगशाळा तंत्रज्ञ १ (प्रति अभ्यासक्रम)

**औषधनिर्माणशास्त्र पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम**

प्राध्यापक १ सहाय्यक प्राध्यापक १ प्रयोगशाळा तंत्रज्ञ १ (प्रति अभ्यासक्रम)

सर्व संबंधित तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये विभागांतर्गत सर्व प्राचार्यांची बैठक बोलावून उपरोक्त मानकांप्रमाणे संस्थेस आवश्यक असलेल्या पदांचे विवरण तयार करतील. संस्था स्तरावर पदांची मागणी करीत असताना समान संस्थांमध्ये तफावत आढळणार नाही याची काळजी सहसंचालक कार्यालयाने तसेच राज्य पातळीवर संचालक तंत्र शिक्षण कार्यालयामार्फत घेण्यांत येईल. त्याचप्रमाणे हॉटेल मॅनेजमेंट व कॅटरिंग टेक्नॉलॉजी पुणे व नागपूर यांकरिता अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकांप्रमाणे आवश्यक पदांची माहिती दोन्ही संस्थांनी एकत्रित तयार करावी. अशा संस्थेमध्ये शिक्षकीय पदांची मागणी करीत असताना उपरोक्त प्रमाणे गुणोत्तर राहील याची दक्षता घेण्यात यावी. त्याचप्रमाणे प्रिंटींग टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमासाठी आवश्यक असणारी पदे श्री. दयानंद मेश्राम, सहसंचालक, मुंबई श्री. डी.पी. नाठे, प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतन मुंबई व श्रीमती ए.सी. अत्तार, प्र. प्राचार्य, शासकीय मुद्रण तंत्रसंस्था, मुंबई यांनी एकत्र बसून ठरविण्यांत यावी.

त्याचप्रमाणे सर्व संस्थांनी आपल्या संस्थेसाठी आवश्यक असणारी पदे ठरविताना राज्यस्तरावरील सर्व पदांची वेतनश्रेणी ही सारखी असावी याची काळजी घ्यावी.

**२) प्रशासकीय तांत्रिक पदांचा संवर्ग कसा असावा याबाबतचा आढावा घेणे.**

तंत्र शिक्षण संचालनालयांतर्गत प्रशासकीय तांत्रिक पदांचा संवर्ग कसा असावा याबाबत बैठकीमध्ये चर्चा झाली असून, यासाठी संचालनालयाने शासनास सादर केलेल्या प्रस्तावानुसार प्रशासकीय तांत्रिक पदांचा संवर्ग ठरविण्यांत आलेला आहे.

३) प्रशासकीय अतांत्रिक पदांचा संवर्ग कसा असावा याबाबतचा आढावा घेणे.

सर्व विभागीय कार्यालयाकडून याबाबत सविस्तर अहवाल व अभिप्राय या संचालनालयास सादर करण्यांस सांगितलेले असून त्यांच्याकडून अहवाल प्राप्त होताच यावर संचालनालय स्तरावर निर्णय घेऊन त्याप्रमाणे शासनास प्रस्ताव सादर करण्यांत येईल असे सर्वानुमते ठरले.

४) तांत्रिक सहाय्यकारी पदांचे अभ्यासक्रम निहाय पुनर्रचना करणे

तंत्र शिक्षण संचालनालयांतर्गत अस्तित्वात असलेल्या पदवी व पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांमधील संबंधित अभ्यासक्रमांच्या प्रयोगशाळेसाठी व कार्यशाळेसाठी सध्या जी पदे अस्तित्वात आहेत त्या पदांना पदोन्नतीच्या समान संध्या उपलब्ध नसल्यामुळे विधानसभेत मा. मंत्रीमहोदयांनी दिलेल्या आश्वासनानुसार कार्यशाळेतील तांत्रिक सहाय्यकारी पदांच्या पदनामामध्ये आवश्यक तो बदल करण्यात यावा व सर्वांना पदोन्नतीच्या समान संधी उपलब्ध होतील याप्रमाणे तांत्रिक सहाय्यकारी पदांची पुनर्रचना करण्याबाबत चर्चा करण्यांत येऊन याबाबत संचालनालय स्तरावर समिती स्थापन करुन पदांच्या पुनर्रचनेबाबत निर्णय घेऊन त्याप्रमाणे संबंधित पदांचे सेवाप्रवेश नियम पुनर्रचित करुन शासनास प्रस्ताव सादर करण्याचे ठरविण्यांत आले.

५) सर्व औषधनिर्माणशास्त्र व वास्तुशास्त्र महाविद्यालयांत ग्रंथपालांची पदे निर्माण करण्याबाबत निर्णय घेणे.

सन २००३ रोजी झालेल्या पदांच्या आढाव्यामध्ये औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थेतील ग्रथपालाची पदे व्यपगत करण्यांत आलेली होती कारण त्यावेळी अस्तित्वात असलेल्या पी सी आय च्या मानकांमध्ये संबंधित पदांचा समावेश करण्यांत आलेला नव्हता परंतु संबंधित संस्थेस ग्रंथपालाचे पद अत्यंत आवश्यक असून त्यासाठी सध्या अस्तित्वात असलेली पी सी आय ची मानके लक्षात घेऊन ग्रंथपाल व सहाय्यक ग्रंथपाल या पदांबाबतच्या मानकांचा विचार करुन संबंधित संस्थेत ग्रंथपालांची पदे निर्माण करण्याबाबत चर्चा करण्यांत आली.

६) सन २००३ च्या आढाव्यानंतर तीन वर्षेपर्यंत रिक्त असलेली पदे पुनर्जिवित करण्याबाबत विचार करणे.

याबाबत संबंधित विभागीय सहसंचालकांकडून प्रस्ताव मागविण्यांत आलेले होते. तथापि, सहसंचालकांकडून आलेल्या प्रस्तावांमध्ये अनेक त्रुटी आढळून आल्यामुळे संबंधित सहसंचालकांच्या ही बाब निदर्शनास आणून देण्यांत आली. व त्याप्रमाणे नवीन प्रस्ताव त्वरीत संचालनालयास सादर करण्याविषयी सूचना देण्यांत आल्या.

मुद्दा क्र. १ प्रमाणे सर्व संस्थांकडून विभागीय कार्यालयांमार्फत माहिती मागविण्याचे ठरले असून, सभा संपल्यावर सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानण्यांत आले व सभा संपल्याचे जाहीर करण्यांत आले.

(जी. आर. ठाकरे)
(सदस्य सचिव)

(प्रा. न.बा. पासलकर)
(अध्यक्ष)

प्रत : सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

D:\d-data\Desk-5\Mal\...

## परिशिष्ट- १

शिक्षकीय पदाचा विचार करताना पदविका अभ्याक्रमासाठी ३०० प्रवेश क्षमतेकरीता ५ अभ्यासक्रम ग्राह्य धरण्यात आलेले असून त्याकरीता ५ विभागप्रमुख ५ अभ्यासक्रमाकरीता राहतील तसेच शिक्षकीय पदे पुढील प्रमाणे असतील.

| | | |
|---|---|---|
| १) यंत्र अभियांत्रिकी | -- | १ + ९ |
| २) विद्युत अभियांत्रिकी | -- | १ + ७ |
| ३) अणुविद्युत/टेलीकम्युनिकेशन अभियांत्रिकी | | १ + ७ |
| ४) स्थापत्य व उपयोजित अभियांत्रिकी | -- | १ + ११ |
| ५) माहिती तंत्रज्ञान अभियांत्रिकी | -- | १ + ७ |
| ६) संगणक अभियांत्रिकी | -- | १ + ७ |
| ७) केमिकल अभियांत्रिकी | -- | १ + ६ |

यापैकी कोणतेही ५ अभ्यासक्रम असू शकतील. या शिक्षकीय पदांबरोबरच इतर शिक्षकीय पदे पुढील प्रमाणे राहतील.

| | | |
|---|---|---|
| ८) प्राचार्य | -- | १ पद |
| ९) गणित | -- | ३ पदे |
| १०)सायन्स | -- | ४ पदे (अधिव्याख्याता भौतिक/पदार्थविज्ञान/रसायनशास्त्रच्या ऐवजी यापुढे अधिव्याख्याता सायन्स असे संबोधावे व त्याप्रमाणे पदनामात बदल करण्यांत यावा. ) |
| ११)कम्युनिकेशन स्कील | -- | २ पदे (अधिव्याख्याता इंग्रजी ऐवजी यापुढे अधिव्याख्याता कम्युनिकेशन स्कील असे संबोधावे व त्याप्रमाणे पदनामात बदल करण्यांत यावा.) |
| १२)प्रशिक्षण व आस्थापना अधिकारी | -- | १ पद |
| १३)सिस्टीम अनॉलिस्ट | -- | १ पद |
| १४)कर्मशाळा अधिक्षक | -- | १ पद |

तसेच स्थापत्य व उपयोजित यंत्रशास्त्र हे विभाग एकच संबोधला जाईल व या दोन्ही विभागासाठी एकच विभागप्रमुख पद ठेवण्यात येईल असे सर्वानुमते ठरले आहे.

**तांत्रिक सहाय्यकारी पदे**

याकरीता कमीत कमी ६ विभागांच्या प्रयोग शाळेचा विचार करण्यांत आलेला असून एका विभागात सरासरी ४ प्रयोगशाळांचा विचार करण्यांत आला आहे.

| | | |
|---|---|---|
| १) प्रयोगशाळा सहाय्यक(तां) | -- | १८ पदे |
| २) प्रयोगशाळा सहाय्यक(अतां) | -- | ०६ पदे |
| ३) विजतंत्री | -- | ०२ पदे |
| ४) प्रोग्रामर | -- | ०२ पदे |
| ५) हमाल | -- | १८ पदे |
| ६) कार्यशाळेसाठी | -- | १० पदे |
| एकूण | -- | ५६ पदे |

**प्रशासकीय पदे(कार्यालयीन कर्मचारी)**

| | | |
|---|---|---|
| १) प्रबंधक | -- | १ पद |
| २) कार्यालयीन अधिक्षक | -- | १ पद |
| ३) मुख्य लिपीक | -- | २ पदे |
| ४) वरिष्ठ लिपीक | -- | ४ पदे |
| ५) कनिष्ठ लिपीक (वसतीगृहासहीत ) | -- | १० पदे |
| ६) शिपाई | -- | ०६ पदे |
| ७) ग्रंथपाल | -- | ०१ पद |
| ८) सहाय्यक ग्रंथपाल | -- | ०१ पद |
| ९) ग्रंथालय शिपाई | -- | ०३ पदे |
| १०)भांडारपाल | -- | ०२ पदे (१ पद कार्याशाळेकरीता व १ पद इतर विभागासाठी) |
| ११)डाटा एन्ट्री ऑपरेटर | -- | २ पदे |
| १२)वाहनचालक | -- | १ पद (सध्या ज्या संस्थेस पद मंजूर आहे त्यांचाच विचार करण्यांत आलेला आहे) |
| एकूण | -- | **३४ पदे** |

ज्या संस्थेतील विद्यार्थी प्रवेशक्षमता ५०० पेक्षा अधिक असेल अशा संस्थेत प्रशासकीय अधिकारी हे पद असावे.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार केला असता ३०० प्रवेशक्षमताकरीता एकंदरीत शिक्षक व शिक्षकेतर पदांचे प्रमाण खालील प्रमाणे राहील.

**शिक्षकीय पदांसाठीचे प्रमाण**

३०० विद्यार्थी प्रवेश क्षमता × ३ वर्ष ÷ १५ (अ.भा.तं.शि.प च्या सरासरी माणकाप्रमाणे ) = ६० पदे

**तांत्रिकी/अतांत्रिक सहाय्यकारी पदे व प्रशासकीय पदांसाठी प्रमाण**

(अ.भा.तं.शि.प च्या सरासरी मानकांप्रमाणे ) १ शिक्षकास १.५ प्रमाणे सहाय्यकारी पदे राहतील. म्हणजेच ३०० प्रवेशक्षमतेसाठी शिक्षकीय पदे एकूण ६० × १.५ = ९० (यापैकी तांत्रिक सहाय्यकारी पदे ५६ व कार्यालयीन प्रशासकीय पदे ३४ या प्रमाणे राहतील.)

तसेच उपरोक्त प्रमाणा प्रमाणे आपल्या संस्थेत मंजूर असलेल्या अभ्यासक्रमानुसार कार्यभाराचा विचार करुन त्याप्रमाणे संस्थेस पदें मंजूर असणे आवश्यक आहे.